**जनसंपर्क अधिकारी**
**पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीस आयुक्त यांचे कार्यालय**
रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोन नं ०२२- २९४५१००१
**Email ID – pro.cp.mb-v@mahapolice.gov.in**

प्रेसनोट क्र. ०९- २०२२ दिनांक ०७/०१/२०२१

## दुचाकी वाहन चोरी करणा-या सराईत आरोपीतांना अटक करुन गुन्हयातील मुदेदमाल हस्तगत- पेल्हार पोलीस ठाणे, गुन्हे प्रकटीकरण कक्षाची कामगिरी.

पेल्हार पोलीस ठाणे हद्दीत वाहन चोरीच्या घटनांमध्ये मोठया प्रमाणावर वाढ झाल्याने वरिष्ठांनी दिलेल्या सुचना व मार्गदर्शनाप्रमाणे पेल्हार पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण शाखेचे अधिकारी व अंमलदार यांनी तांत्रिक विश्लेषण व गुप्त बातमीदार यांच्या मार्फत मिळालेल्या माहितीचे अनुषंगाने १) इरफान आशिकअली शेख वय-२१ वर्षे, रा. धानिवबाग, नालासोपारा पुर्व, ता. वसई जि. पालघर २) रफिक उस्मान शेख, वय-२५ वर्षे, रा. पेल्हार, नालासोपारा, पुर्व ता. वसई जि. पालघर ३) विकास रमेश गुजाळ, वय- २२ वर्षे, रा. नवजीवन, वसई पुर्व ता. वसई जि. पालघर यांना ताब्यात घेवुन त्यांचेकडे विचारपुस केली असता त्यांनी मोटर सायकल चोरी केल्याची कबुली दिल्याने नमुद आरोपीत यांना वालीव पोलीस ठाणे गुन्हा रजि. नं. ११८०/ २०२१ भा.दं.वि.सं. कलम ३७९ या गुन्हयात दिनांक ०२/०१/२०२२ रोजी अटक करण्यात आली आहे.

सदर गुन्हयाचे अनुषंगाने गुन्हे प्रकटीकरण शाखेचे अधिकारी व अंमलदार यांनी अटक आरोपीत यांचेकडे अधिक चौकशी केली असता त्यांनी वालीव, नारपोली, नयानगर परिसरातुन मोटर सायकल चोरी केल्याची कबुली दिली असुन आरोपीत यांचेकडुन ०६ मोटार सायकल असा एकुण- २,६८,०००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. नमुद आरोपीत यांचेकडून खालील प्रमाणे गुन्हे उघडकीस आले आहे.

१) वालीव पो.स्टे. गु.रजि.नं. I ११८०/२०२१, भा.दं.वि.सं. कलम- ३७९.
२) नयानगर पो.स्टे. गु.रजि.नं. I ४४१/२०२०, भा.दं.वि.सं. कलम- ३७९.
३) नारपोली पो.स्टे. गु.रजि.नं. I ७६०/२०२१, भा.दं.वि.सं. कलम-३७९.
४) नारपोली पो.स्टे. गु.रजि.नं. I ७६९/२०२१, भा.दं.वि.सं. कलम- ३७९.
५) नारपोली पो.स्टे. गु.रजि.नं. I ७८६/२०२१, भा.दं.वि.सं. कलम- ३७९.

सदरची कामगिरी श्री. प्रशांत वाघुंडे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-३, श्री. रामचंद्र देशमुख, सहायक पोलीस आयुक्त, विरार विभाग यांचे मार्गदर्शनाखाली श्री. विलास चौगुले, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पेल्हार पोलीस ठाणे, श्री. महेंद्र शेलार, पोलीस निरीक्षक (गुन्हे), पेल्हार पोलीस ठाणे, गुन्हे प्रकटीकरण शाखेचे पो.उप.नि. सनिल पाटील, पो.हवा. योगेश देशमुख, तुकाराम माने, पो.ना. तानाजी चव्हाण, प्रताप पाचुंदे, पो.अं. संदिप शेळके, मोहसिन दिवाण सचिन बळीद, रोशन पुरकर, बालाजी गायकवाड, किरण आव्हाड यांनी केलेली आहे.